**वाचले** :- नगररचनाकार, बारामती यांचेकडील पत्र क्र. भो.प्र./मौ.कान्हाटी/ता.बारामती/ग.नं.१४०५/नरबा/०७, दिनांक ०५/०१/२०२३

---

उपविभागीय अधिकारी बारामती
उपविभाग बारामती यांचे कार्यालय
क्रमांक बांपुदा/एसआर/ २९ /२०२२
बारामती दिनांक : ०६ /०१/२०२३

## <u>भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate)</u>

### (महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ प्रमाणे)

मौजे कान्हाटी, ता. बारामती, जि. पुणे येथील जमीन ग. नं. १४०५ मधील क्षेत्र ३२१००.०० चौ. मी. जागेवरील शैक्षणिक प्रयोजनासाठीचे इमारतींच्या बांधकामास नगररचनाकार, बारामती शाखा, बारामती यांचेकडील पत्र क्रमांक-एनएबीपी/ मौजे. कान्हाटी/ ता.बारामती/ग.नं.१४०५पै/नरबा/५२८, दिनांक ०९.०५.२०२२ अन्वये मंजूरीसाठी शिफारस केलेली आहे. त्यास अनुसरुन या कार्यालयाकडील आदेश क्र. एनए/एसआर/३८/२०२२, दिनांक २४.०८.२०२२ अन्वये सदर जागेतील बांधकामास परवानगी दिली आहे.

प्रस्तुत जागेतील शैक्षणिक वापराचे भागशः बाधकाम पूर्ण झाले बाबत भागशः भोगवटा प्रमाणपत्र मिळणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावासोबत वास्तुविशारद श्री. प्रफुल्ल तावरे, बारामती यांनी सदर पत्राशेड इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे पूर्ण झाले असल्याबाबतचे दि. २५.०७.२०२२ रोजीचे APPENDIX-G हे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. तसेच सदर इमारत बांधकामाच्या स्ट्रक्टचरल स्टॅबिलिटीबाबत स्ट्रक्टचरल इंजिनिअर श्री. मिलींद कुलकर्णी, पुणे यांनी प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यास अनुसरुन नगररचनाकार, बारामती शाखा, बारामती या कार्यालयाकडून सदर इमारत बांधकामाची तपासणी करण्यात केली असता सदर जागेतील शैक्षणिक इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे आवश्यक ती सामासिक अंतरे सोडून भागशः पुर्ण केले असल्याचे दिसुन आलेमुळे शैक्षणिक इमारतीच्या बांधकामास भागशः भोगवटा प्रमाणपत्र देणेसाठी शिफारस केली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

<u>बांधकामाचा तपशील</u>

| अ. क्र. | मंजूरी नुसार | प्रत्यक्ष जागेवर | भोगवटा प्रमाणपत्रासाठी मंजूरी |
|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक इमारत - तळमजला एकुण १० वर्ग खोल्या व दोन स्वच्छतागृहे इत्यादी (एकुण बांधीव क्षेत्र ९३३.२५ चौ. मी. ) | पश्चिमेकडील बाजूच्या चार वर्ग खोल्या व एक स्वच्छतागृह इ. बांधकाम पुर्ण (एकुण बांधीव क्षेत्र २७४.२० चौ. मी. ) | पश्चिमेकडील बाजूच्या चार वर्ग खोल्या व एक स्वच्छतागृह इ. बांधकाम पुर्ण (एकुण बांधीव क्षेत्र २७४.२० चौ. मी. ) |

सबब उपरोक्त तपशीलामध्ये नमूद **शैक्षणिक इमारतीचे बांधकामास भागशः भोगवटा प्रमाणपत्र** देणेत येत आहे.

उपविभागीय अधिकारी, बारामती
सत्यमेव जयते
उपविभाग, बारामती

**(दादासाहेब कांबळे)**
**उपविभागीय अधिकारी,**
**बारामती उपविभाग बारामती**

प्रति : १. सचिव, कृषी उदयोग मुल शिक्षण संस्था कान्हाटी, रा. कान्हाटी, ता. बारामती, जि. पुणे.

प्रत : २. नगर रचनाकार, बारामती शाखा, बारामती यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.